# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा ९/२०२३/** **दि. - ०४.०९.२०२३**

**नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र. ०९**

**दिनांक - ०४.०९.२०२३**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची आठवी सभा **सोमवार दि. ०४.०९.२०२३ रोजी सकाळी ११.००** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

## विषय – पत्रिका

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात सहकार मंत्री पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..... | |
| विषय क्र. २ | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०८. दि. १६.०२.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| विषय क्र. ३ | महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाबाबत.<br>१.NBA कमिटीने महाविद्यालयास दिलेल्या भेटी बाबत.<br>२.शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेशाबाबत.<br>३. महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत.<br>४. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी Indication Programme बाबत.<br>५. NAAC २०२१-२२ या वर्षाच्या AQAR बाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ४ | प्राचार्य पदाचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी २०२४ ला पूर्ण होत आहे याबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ५ | महाविद्यालय स्वायत्य (Autonomy) करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ६ | महाविद्यालयाच्या कार्यालयातील सहाय्यक प्रशासकीय श्री. धनवडे विलास बी. यांना नेमणूक आदेश मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ७ | महाविद्यालयातील नियामक मंडळा (**BOG**) मध्ये नवीन शिक्षक प्रतिनिधीची नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे व महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ८ | महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ADHOC शिक्षक व कंत्राटी पद्धतीने काम करत असणाऱ्या शिक्षकेत्तर सेवकांच्या पगार / मानधन वाढी बाबत चर्चा करणे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संस्थेमार्फत रीतसर मुलाखती घेऊन नेमणूक केलेल्या adhoc शिक्षक सेवकांची नेमणूक आदेश व वेतन अदा करणेस परवानगी मिळणेबाबत | |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

| | | |
|---|---|---|
| विषय क्र. ९ | कायम शिक्षक सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या कडून आलेल्या सातव्या वेतन आयोगाची अंमबलबजावणी करणेबाबत आलेल्या पत्राबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १० | महाविद्यालयातील कायमस्वरूपी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत तरी सेवानिवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची नियमितपणे भरती करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ११ | महाविद्यालयातील सेवकांनी केलेल्या कोर्ट केस बाबतची चर्चा करणे. | |
| **विषय क्र. १२** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. १२.१ | प्रलंबित देयके अदा करणेकामी मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १२.२ | सुधारित दराने प्रवास व दैनिक भत्ता देणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १२.३ | महाविद्यालयाच्या सभागृह व विभागाकरिता नवीन खुर्च्या, 160 KV Generator, Interactive Panel / Smart Board खरेदी, **Exam Centre Renovation**, क्लासरूम रेनोव्हेशन व बाथरूम रेनोव्हेशन करणेकामी मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १२.४ | महाविद्यालयाचे सभागृह भाडे तत्वावर देणे व दरपत्रकाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. १२.५ | सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन निवेदाद्वारे नेमणूक करणेत आलेली होती. सदर नेमणूक कालावधी माहे फेब्रुवारी २०२३ रोजी पूर्ण झाली असून माहे मार्च २०२३ पासून दरमहा ठरविलेनुसार वेतन अदा करणेस परवानगी मिळावी. | |
| विषय क्र. १२.६ | द्वितीय वर्ष सिव्हील मधील विद्यार्थी गौरव गाडे याच्या फी माफीबाबत. | |
| **विषय क्र. १३** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्रत - सर्व सन्मानीय सदस्य - नियामक मंडळ

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

जा. क्र. ग.बॅ.स./सभा९/२०२३/ दिनांक — ०४.०९.२०२३

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०९**

**दिनांक - सोमवार दि. ०४.०९.२०२३**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची नववी सभा **सोमवार दि. ०४.०९.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. यासभेस खालील मान्यवर उपस्थित होते.
उपस्थित सदस्य —

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन Online |
| २. | मा. श्री. चंद्रकांत दळवी साहेब<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. श्री. विकास देशमुख साहेब<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य Online |
| ५. | प्रा. डॉ. एम बी कुमठेकर | सदस्य Online |
| ६. | मा. श्री. उदय जाधव | सदस्य Online |
| ७. | डॉ. एस. एल.नलबलवार | सदस्य Online |
| ८. | डॉ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा. आ. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १ :- मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात सहकार मंत्री पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.....**

**ठराव क्र. १** :- मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात सहकार मंत्री पदी निवड झाल्याबद्दल सर्वांच्या वतीने हार्दिक अभिनंदन केले.

**सूचक :- मा. श्री. उदय जाधव साहेब**
**अनुमोदक :- मा. श्री. विकास देशमुख साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. २ :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०८. दि. १६.०२.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**ठराव क्र २**:- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०८, दि. १६.०२.२०२३ रोजीचा इतिवृत्तांत सोबत आपल्या अवलोकनार्थ जोडला आहे. तरी सदर इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०८, दि. १६.०२.२०२३ मध्ये घेणेत आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

**खालील प्रमाणे मागील नियामक मंडळातील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व त्यानुसार सभेने अवलोकन केले.**

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०८ दि. १६.०२.२०२३ इतिवृत्तांत वाचून कायम करणे तसेच निर्णयावरील कार्यवाहीची सभेने नोंद घेतली. | सभेने सर्व विषयाचे अवलोकन केले व मागील निर्णय कायम केले. |
| ठराव क्र.०२. | माहे ०१.०४.२०२२ ते ३१.१२.२०२२ अखेरच्या तेरीजपत्रकास व सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकास सभेची मंजुरी घेणे.<br>**अ. तेरीजपत्रक ब. अंदाजपत्रक** | तेरीजपत्रक व अंदाजपत्रक सभेने अवलोकन करून मंजुरी दिली. |
| ठराव क्र.०३. | कै. भूपाल अण्णा बहीशेट, व श्रीमती लीलावती व देवेंद्र बसप्पा दोड्ण्णावर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे पारितोषिक हे महाविद्यालयात प्रत्येक विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीस दिलेल्या पारितोषिकाबाबत माहिती देणे. | सभेने चर्चा करून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. |
| ठराव क्र.०४. | महाविद्यालयातील सेवकांनी रयत शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयासमोर करणेत आलेल्या आंदोलन व उपोषणानंतर महाविद्यालयात निर्माण झालेल्या विविध मुद्द्याबाबत चर्चा करणे. | महाविद्यालयातील दोन सेवकांची कर्मवीर भाऊराव पाटील येथे बदली करून त्यांना कारणे दाखवा नोटीस देणेबाबत शिफारस करणेत आली.<br>**सदर ठरावास डॉ. एस. एल. नलबलवार सर यांनी असहमती दर्शवली आहे.** |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.०५. | NBA कमिटी भेटीच्या अनुषंगाने महाविद्यालयात करावयाच्या कामकाजाबाबत.<br>१. NBA कमिटी भेटीच्या तारखेबाबत चर्चा करणे.<br>२. NBA साठी जात असलेल्या महाविद्यालयातील तीन विभागामध्ये प्रत्येकी एक सहयोगी प्राध्यापक संस्था पातळी वर नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे.<br>३. महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षकेत्तर सेवक (कनिष्ट लिपिक व प्रयोगशाळा सहाय्यक) यांना ११ महिन्याची नेमणूक आदेश देणेबाबत चर्चा करणे.<br>४. NBA कडून NBA कमिटीच्या भेटीच्या तारखेबाबत आलेल्या स्मरणपत्राबाबत चर्चा करणे | NBA कमिटीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेत आली. |
| ठराव क्र.०६. | प्रा. शेलार ए. बी. व डॉ. तपासे ए. बी. यांनी मा. सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांना पाठविणेत आलेल्या ईमेल व पत्राबाबत चर्चा करणे. | याबाबत संस्था स्तरावर पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. |
| ठराव क्र.०७. | कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत.<br>मुद्दा क्र. १,२,३,४,५,६. | नोंद घेण्यात आली असून विविध मुद्द्यांचे आवश्यक नुसार कार्यवाही केली. |
| ठराव क्र.०८. | **Dean Administration** व **Controller of Examination** यांनी तडकाफडकी दिलेल्या राजीनामाबाबत चर्चा करणे. | COE पदाचा राजीनामा मंजूर करून नवीन COE पदाची अंतर्गत नेमणूक केली |
| ठराव क्र.०९. | महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे. | कार्यरत असलेली खरेदी समिती आहे त्याच प्रमाणे ठेवून BOG मधील शिक्षक प्रतिनिधी म्हणून डॉ. सौ. माने एस.व्ही. यांची सदस्य म्हणून निवड केली. |
| ठराव क्र.१०. | महाविद्यालयात कायदेशीर अडचणी व समस्या निर्माण होत असतात त्याकरिता स्वतंत्र कायदा तज्ञ यांची नियुक्ती करणेसाठी परवानगी मिळावी. | कायदा तज्ञ यांची नेमणूक करणेची प्रक्रिया सुरु आहे. |
| ठराव क्र.११. | महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी सेवकांना सन २०१२-१३ पासून ते सेवानिवृत्त कालावधीत भोगलेल्या अर्जित रजेमधून रजा खातेवर शिल्लक असलेल्या रजेचे रजा रोखीकरण प्रस्तावास मंजुरी मिळणे. | त्यानुसार अंमलबजावणी करणेत आली. |
| ठराव क्र.१२. | महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्स बाबत चर्चा करणे. | इलेक्ट्रिकल मेंटेनन्ससाठी इलेक्ट्रिकलची तात्पुरत्या हंगामी स्वरुपात नेमणूक करणेत आली. |
| ठराव क्र.१३. | महाविद्यालयातील विविध विभागातील कामकाजाकरिता टेन्डर मागविली आहेत त्याची माहिती देणे. | सदर टेन्डरची प्रक्रिया रीतसर संस्थेच्या नियमानुसार करणेत आली. |
| **ठराव क्र.१४** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | -- |
| ठराव क्र. १४.१ | पी.एफ. चा दंड भरणेस परवानगी मिळणेबाबत. | याबाबत सभेने चर्चा करून दंड भरणेस परवानगी दिली व त्यानुसार पी.एफ. चा दंड भरणेत आला. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. १४.२ | NBA कमिटी अनुषंगाने विविध विभागातील कामकाजासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | खर्चास मंजुरी देण्यात आली. **सदर ठरावास डॉ. एस. एल. नलबलवार सर यांनी असहमती दर्शवली आहे.** |
| ठराव क्र. १४.३ | महाविद्यालयातील प्लंबिंगचे काम करणेत आलेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | केलेल्या कामकाजानुसार सदरची बिले परवानगी नुसार खर्ची टाकण्यात आलेली आहेत. |
| ठराव क्र. १४.४ | मुलींच्या वसतीगृहामध्ये नवीन पिण्याच्या पाण्याचा कुलर खरेदी करणेस परवानगी मिळावी. | नवीन कुलर खरेदी करण्याची प्रोसेस सुरु करणेत आली आहे. |
| ठराव क्र. १४.५. | कायम शिक्षकेत्तर सेवकांनी १२ वर्ष कालबद्ध पदोन्नती फरकाच्या रक्कमेस परवानगी मिळणेबाबत. | फरकाची रक्कम अदा करणेत आली. |
| ठराव क्र. १४.६ | IT Cell विभागातील विविध परीक्षेमध्ये काम करत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत चर्चा करणे. | त्यानुसार अंमलबजावणी करणेत आली. |
| ठराव क्र. १४.७ | वर्कशॉप मधील रोजंदारी तत्वावर काम करीत असलेल्या सेवकांच्या मानधनाबाबत. | सभेच्या परवानगी नुसार मानधन वाढवून देण्यात आले. |
| ठराव क्र. १४.८ | कु. आशितोष राजेंद्र शिंदे या विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती मिळणेबाबत केलेल्या अर्जाबाबत. | सभेतील ठरावानुसार सदर विद्यार्थ्याला कर्मवीर शिष्यवृत्ती देण्यात आली. |
| ठराव क्र. १४.९ | कु. शुभम बी. भिंगवडे या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक फी माफ करून शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत. | सभेतील ठरावानुसार विद्यार्थ्याला कागदपत्रे देण्यात आली. |
| ठराव क्र. १४.१० | श्री. कदम एम. व्ही. भांडारपाल यांनी निलंबनापूर्वी खरेदी केलेल्या NAAC काळातील बिलांबाबत चर्चा करणे. | सदरची बिले मंजूर करणेत आली. |
| ठराव क्र. १४.११ | मार्च २०२२ मध्ये पुणे येथे झालेल्या खरेदी समितीच्या सभेकरिता झालेल्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | सभेच्या परवानगी नुसार बिले मंजूर करणेत आली. |
| **ठराव क्र. १५** | **मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |
| ठराव क्र. १५ .०१ | महाविद्यालयातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले शिक्षकेत्तर सेवकांनी विविध मागण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत. | सदरच्या विविध मागण्या ह्या आर्थिक असल्याने देण्यात येऊ नये असे सूचित केले. |
| ठराव क्र. १५ .०२ | महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशाबाबतची सभेस माहिती देणे. | सभेने पुढील वर्षात जास्त प्रवेश होण्याकरिता विविध प्रक्रिया राबविण्यात सुचविल्या त्यानुसार कार्यवाही सुरु केलेली आहे. |
| ठराव क्र. १५ .०३ | महाविद्यालयातील एम.टेक या विद्याशाखेचे प्रवेश (Admission) सातत्याने कमी होत आहेत, त्याबाबत चर्चा करणे. | एम.टेक या विद्याशाखेचे INTAKE शून्य करणेत आले. तसेच मागणी वाढल्यास यथावकाशाने सुरु करावेत असे ठरले. |

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर :-**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र - ०३. महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाबाबत**

**ठराव क्र ०३:-१.NBA कमिटीने महाविद्यालयास दिलेल्या भेटी बाबत**- दि. १९.०५.२०२३ ते दि. २१.०५.२०२३ रोजी महाविद्यालयात NBA कमिटीने सिव्हील इंजिनिअरींग, कॉम्प्युटर सायन्स & इंजिनिअरिंग व मेकनिकल इंजिनिअरींग या विभागाचे मुल्यांकन करणेसाठी भेट दिली.

**NBA कमिटीने महाविद्यालयातील खालीलप्रमाणे कामकाजाचे प्रशंसा केले.**

१. महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज अतिशय चांगले व पारदर्शक आहे.
२. महाविद्यालयामधील सेवकांची सेवापुस्तके अद्यावत आहेत व ती शासन नियमाप्रमाणे ठेवली आहेत.
३. सिव्हील इंजिनिअरींग विभागात घेत असलेल्या विविध कन्सलटन्सी बाबत कमिटीने कौतुक केले.
४. IQAC विभागाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

**NBA कमिटीने खालीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत.**

१. Cadre Ratio प्रमाणे शिक्षक सेवकांची नियमित नेमणूक करावी.
२. Delegation of Power (Financial) वेगवेगळ्या स्थरावर करण्यात यावी.
३. तांत्रिक सहाय्यक, प्रायोगशाळा सहाय्यक आणि कार्यालयीन सेवक यांच्या नियमित नियुक्त्या कराव्यात.
४. विविध विभागातील प्रयोगशाळेतील साहित्य (Latest Lab Equipment) खरेदी करावे.
५. शिक्षकांनी संशोधनातील सहभाग वाढवावा.

**२. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेशाबाबत:-**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता खालील तक्त्याप्रमाणे प्रवेशित विद्यार्थी झालेले आहेत.

**First Year Admission Chart - 2023-24**

| Sr. No. | Department Name | Intake | Total Admitted Student |
|---|---|---|---|
| 01. | Civil Engineering | 60 | 33 |
| 02. | Computer Science & Engineering | 120 | 138 |
| 03. | E & Tc Engineering | 60 | 67 |
| 04. | Mechanical Engineering | 60 | 34 |
| **Total** | | **300** | **272** |

**३. महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत :-**

- इनरव्हील क्लब यांच्या समवेत सामंजस्य (MOU) करार करणेत आला.
- श्रीनिवास पाटील फौंडेशन संचलित युवा ३६० कार्यशाळा आयोजित करणेत आली.
- महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यासाठी इनरव्हील क्लब यांच्या मार्फत सर्व विद्यार्थिनीसाठी Self-Defiance कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे आणि ISTE यांच्या मार्फत आयोजित केलेल्या FDP Programme महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभागामार्फत घेण्यात आला. सदर FDP साठी विद्यापीठामार्फत निधी देण्यात येणार आहे.
- प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रीये साठी विद्यार्थ्यासाठी व पालकांसाठी मार्गदर्शन मेळावा आयोजित करणेत आला होता
- सर्व विभागातील प्रथम सत्र सुरु होताच पालक मेळावा व विद्यार्थ्यासाठी <u>Induction Programme</u> आयोजित करणेत आली.

**४. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी आयोजित केलेल्या Induction Programme बाबत:-**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी दि. ०७.०८.२०२३ ते दि. १७.०८.२०२३ या कालावधीत महाविद्यालयामध्ये विविध विषयावर Inducation Programme चे आयोजन करणेत आले होते यामधून प्रथम वर्ष प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील माहिती देण्यात आली. तसेच विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व व्याख्यान आयोजित करणेत आले होते.

**५.NAAC २०२१-२२ या वर्षाच्या AQAR बाबत चर्चा करणे:-**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचा AQAR भरणेत आलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० ला NAAC नामांकन प्राप्त झाले होते सदर NAAC नामांकनाचा कालावधी पाच वर्षाचा असल्याने पुढील नामांकन ची प्रक्रिया करणेसाठी NAAC संबधी शैक्षणिक व प्रशासकीय बाबी यांचा विचार करून पुढील कार्यवाही करणेसाठी सभेची परवानगी मिळावी.

**वरील ०१ ते ०५ मुद्द्यांची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली.**

**त्यानुसार सभेने चर्चा करून मुद्दा क्र. ०१ नुसार NBA कमिटी ने सुचविलेल्या Power of Delegation करिता सर्व विभागप्रमुख यांना रक्कम रु. ५०००/- खर्च करण्यास व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना रक्कम रु. २५०००/- रु. खर्च करणेस परवानगी देणेबाबत चर्चा झाली. खरेदी करताना संस्था नियमानुसार खरेदी प्रक्रिया राबवून खर्च करावा अशी चर्चा झाली त्यानुसार मा. चेअरमन, रयत शिक्षण संस्था सातारा यांनी अभ्यासपूर्वक प्रस्ताव तयार करून पुढील नियामक मंडळाच्या सभेमध्ये विषय घेण्यात यावा असे प्राचार्य यांना सुचविले व त्यानुसार सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.**

**तसेच वरील मुद्दा क्र. ०२. नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता झालेल्या प्रवेशाबद्दल सभेने चर्चा करून महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागासाठी प्रवेशित विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावे व विविध उपक्रम राबविण्यात यावेत तसेच महाविद्यालयामध्ये नवीन विद्याशाखा सुरु करावी असे सभेने सुचविले.**

**वरील मुद्दा क्र ०३. व ०४. नुसार महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम व Induction Programme बाबत सभेने अवलोकन केले.**

**मुद्दा क्र ०५. नुसार NAAC २०२१-२२ या वर्षाच्या AQAR भरणेत आलेला आहे. त्यास सभेने चर्चा करून परवानगी दिली व पुढील NAAC चे मुल्यांकन हे A++ मिळावे हि अपेक्षा व्यक्त केली त्याअनुषंगाने आवश्यक असणारी संपूर्ण तयारी करावी अशी सभेने सूचना केली.**

**सूचक :- मा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ४ :- प्राचार्य पदाचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी २०२४ ला पूर्ण होत आहे याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ४ :-** महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. ए. सी. अत्तार यांचा पहिला टेन्युअर संस्था आदेशानुसार दि. ०५.०३.२०१९ पासून ते दि. २९.०२.२०२४ असा आहे. नेमणूक आदेशानुसार दि. २९.०२.२०२४ रोजी प्राचार्य पदाची पाच वर्षाचा कालावधी पूर्ण होत असल्याने पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी फेरनियुक्ती (Re-Appointment) होण्यासाठी सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

वरील विषयाबाबत सभेने चर्चा करून प्राचार्यांचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज हे उत्तम रित्या असल्याने पुढील पाच वर्षाकरिता डॉ. ए. सी. अत्तार यांना प्राचार्य म्हणून फेरनियुक्ती (Re-Appointment) करणेस सभेने परवानगी दिली.

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.५ :- महाविद्यालय स्वायत्य (Autonomy) करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र ५ :-** महाविद्यालयास NBA कमिटीने भेट दिली असून महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक दर्जा वाढविणेसाठी महाविद्यालय Autonomy करणे गरजचे आहे. त्यानुसार Autonomy बाबत सर्व घटकांची माहिती घेण्यात आली असून त्याबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

**सदर विषयाबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. Autonomy बाबत सर्व माहिती घेऊन त्याची सर्व तयारी करणेत यावी व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक याबबत प्रशिक्षित करणेत यावे. NEP (National Education Policy) मध्ये Autonomy अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यामुळे महाविद्यालय Autonomy करणे आवश्यक आहे. असे मत सभेने व्यक्त केले. महाविद्यालयाच्या दुसरे NAAC चे पुर्नमुल्यांकन सन २०२४-२५ मध्ये असल्याने त्यासाठी लागणारी तयार पूर्ण करून NAAC चे मानाकन A++ मिळणेसाठी प्रयत्न करावे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये Autonomy प्रस्ताव द्यावा.**

**सूचक :- डॉ. सौ. एस. व्ही. माने**
**अनुमोदक :- मा. डॉ. एम. बी. कुमठेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय ★ सातारा ★

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ६ :- महाविद्यालयाच्या कार्यालयातील सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (Assistant Administrative Officer) श्री. धनवडे विलास बाबुराव यांना नेमणूक आदेश मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ६ :- Assistant Administrative Officer, Stenographer, Office Superintendent** या रिक्त असलेल्या पदाकरिता नियामक मंडळाची (BOG) सभा क्र.५, दि. ०९.०५.२०२२ रोजी मधील ठराव क्र. ०९ (अ) व रयत शिक्षण संस्थेचे पत्र क्र उ. शि./१५४५२, दि. २५.०२.२०२२ नुसार कायम पदे भरणेकरिता मान्यता घेण्यात आली होती. सदर रिक्त असलेल्या पदांची रयत शिक्षण संस्थेद्वारे अर्ज मागवून रीतसर मुलाखती घेण्यात आल्या होत्या. मुलाखती मधून सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (**Assistant Administrative Officer**) या पदासाठी श्री. धनवडे विलास बाबुराव यांना ११ महिन्याचा नेमणूक आदेश देण्यात आलेला होता. सदरचा नेमणूक आदेश दि. ३०.०६.२०२३ या तारखेला संपलेला आहे. श्री. धनवडे विलास बाबुराव. कार्यालयातील नियमित कामे व्यवस्थितपणे व जबाबदारीने पार पाडत आहेत. तरी श्री. धनवडे विलास बाबुराव यांची नियमित नियुक्ती करणेसाठी परवानगी मिळावी.

**वरील विषयाबाबत महाविद्यालयातील सर्व प्रशासकीय कामकाज करणेसाठी कायम स्वरूपी जबाबदार अधिकारी असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच विविध शिखर संस्था** (DTE, AICTE, Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, इ.) **तसेच रयत शिक्षण संस्था, सातारा या विभागातील वेळोवेळी तातडीने व महत्त्वाची माहिती सादर करणे गरजेचे असल्याने नियमित कार्यालयीन अधिकारी असणे आवश्यक आहे. तरी सध्या कार्यरत असलेले श्री. धनवडे विलास बाबुराव सहाय्यक प्रशासकीय अधिकारी यांची नियमित नेमणूक करणेत यावी असे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेने माहिती दिली. या पदाची नियुक्ती करणेसाठी महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे. त्यानुसार सर्व सन्मानीय सदस्य यांनी चर्चा करून श्री. धनवडे विलास बाबुराव यांची नियमित नियुक्ती करणेस सभेने परवानगी दिली.**

**सूचक :- प्रा. डॉ. सौ. एस. व्ही. माने**
**अनुमोदक :- मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ७ :- महाविद्यालयातील नियामक मंडळा (BOG) मध्ये नवीन शिक्षक प्रतिनिधीची नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे व महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र ७ :-** महाविद्यालयातील नियामक मंडळाची (BOG) स्थापना रयत शिक्षण संस्थेकडील जा. क्र. जन. ७१६७, दि. २३.०८.२०२२ रोजीच्या पत्राने आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांच्या नियमानुसार सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीसाठी करणेत आलेली आहे. सदर समितीमधील शिक्षक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करणेत आलेले डॉ. मांडवे एस. ए. यांची दि. ३१.०१.२०२३ रोजी स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतली असून रयत शिक्षण संस्थेने सदर शिक्षक सेवकांची स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजूर केली आहे.

तरी वरील नियामक मंडळाच्या समितीतील एक शिक्षक प्रतिनिधी कमी झाल्याने सदर शिक्षक प्रतिनिधीच्या जागेवर नवीन शिक्षक प्रतिनिधीची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार सभेने चर्चा करून शिक्षक सेवकाची सदस्य या पदावर नेमणूक करणेसाठी परवानगी मिळावी.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | पद | सेवानिवृत्त तारीख | शिल्लक सेवाकाळ |
|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Patil Nagendra Krishna | Associate Professor | 31.01.2024 | 05 Month |
| 2 | Mr. Degaonkar Arun Bapurao | Associate Professor | 31.07.2024 | 11 Month |
| 3 | Mr. Shingate Vijay Shivaji | Associate Professor | 31.10.2024 | 01 Year 02 Month |
| 4 | Mr. Pisal Anil Balkrishna | Associate Professor | 31.10.2024 | 01 Year 02 Month |
| 5 | Mr. Shivdas Sunil Sakharam | Associate Professor | 28.02.2026 | 02 Year 05 Month |
| 6 | Mr. Nanaware Jalindar D | Associate Professor | 31.05.2026 | 02 Year 09 Month |
| 7 | Dr. Kanase Yuvraj Krishnarao | Associate Professor | 31.07.2028 | 04 Year 11 Month |
| 8 | Dr. Mrs. Modi Shabina Jameer | Associate Professor | 31.08.2036 | 13 Year |

- तसेच महाविद्यालयात नियामक मंडळ (BOG) समिती कार्यरत असून स्थानिक समिती गठीत करणेबाबत सेवकांनी अर्ज सादर केलेले आहे. याबाबत डॉ. बाबसाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, यांचे मार्गदर्शन मिळणेसाठी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून योग्य मार्गदर्शन मिळावे.

**वरील विषयाबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. महाविद्यालयातील ज्या सेवकांची सेवा ०३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिल्लक आहे अशा सहयोगी प्राध्यापकाची निवड करणेत यावी असे ठरले. त्यानुसार डॉ. सौ. मोदी शबिना जमीर सहयोगी प्राध्यापक यांचा सेवाकाळ जास्त असल्याने व प्रशासकीय, शैक्षणिक व इतर कामकाज चांगले असल्याने सर्व सन्मानीय सदस्यांनी एक मताने निर्णय घेऊन डॉ. मोदी शबिना जमीर सहयोगी प्राध्यापक यांची नियामक मंडळाच्या (BOG) रिक्त जागेवर निवड केली.**

**तसेच महाविद्यालयातील सेवकांनी सादर केलेल्या अर्जानुसार स्थानिक समिती गठीत करणेबाबत सदर सभेमध्ये चर्चा करणेत आली. यानुसार मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांनी व सन्मानीय सदस्य यांनी नियामक मंडळ (BOG) कार्यरत असताना स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) गठीत करणे योग्य नाही असे सुचविले. तसेच महाविद्यालयाने विद्यापीठास नियामक मंडळ (BOG) अस्थित्वात असताना स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करावी का? याबाबत मार्गदर्शन मागविले आहे. विद्यापीठाचे मार्गदर्शन आल्यानंतर ह्या मुद्यावर पुनश्चः चर्चा करणेत यावी असे ठरले.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्नींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ८ - महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ADHOC शिक्षक व कंत्राटी पद्धतीने काम करत असणाऱ्या शिक्षकेत्तर सेवकांच्या पगार / मानधन वाढी बाबत चर्चा करणे.**

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संस्थेमार्फत रीतसर मुलाखती घेऊन नेमणूक केलेल्या adhoc शिक्षक सेवकांची नेमणूक आदेश व वेतन अदा करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ८** — महाविद्यालयातील रिक्त असणारी शिक्षक सेवकांची पदे ADHOC तत्वावर व शिक्षकेत्तर सेवकांची पदे रोजंदारी / कंत्राटी तत्वावर आवश्यकतेनुसार दरवर्षी नियामक मंडळाची व संस्थेची परवानगीने भरत आहोत. त्यानुसार समितीच्या अहवालानुसार मासिक मानधन व दरमहा वेतन हे महाविद्यालयाची नियामक मंडळाची सभा क्र. ०४ मध्ये मंजुरी घेण्यात आलेली आहे.

परंतु, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नेमणूक करणेत येणाऱ्या adhoc शिक्षक सेवकांना व महाविद्यालयात रोजंदारी तत्वावर कामकाज करत असलेल्या सेवकांना दरमहा वेतन / मानधन देण्यासाठी मा. श्री. उदय जाधव सर व मा. डॉ. कुमठेकर एम. बी. नियामक मंडळाचे सदस्य यांच्या सोबत चर्चाकरून व पदानुसार वेतनाचा तक्ता तयार करणेत आलेला आहे. त्यानुसार संस्था नियमानुसार मुलाखती होऊन उमेदवारांची निवड करणेत आलेली आहे.

तसेच निवड करणेत आलेल्या adhoc उमेदवारांची मा. डॉ. एन. बी. पासलकर यांनी मुलाखती घेऊन उमेदवाराच्या अनुभवानुसार तयार करणेत आलेल्या वेतनाच्या तक्त्यानुसार वेतन अदा करणेस शिफारस केलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी हंगामी शिक्षकाची विहित पद्धतीने जाहिरात देऊन निवड करण्यात आली आहे. त्यानुसार सदर हंगामी adhoc शिक्षकांची माहिती व निवड केलेनुसार दरमहा देण्यात येणारे वेतन / पगाराची माहिती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | शिक्षकाचे नाव | पदनाम | पगार प्रति महिना | | नियुक्ती | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पगार | PF | पासून | पर्यंत |
| A. | **सिव्हील इंजिनिअरिंग(UG)** | | | | | |
| ०१. | फाळके अपर्णा विक्रमसिंह | सहाय्यक प्राध्यापक | ३०२४० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ०२. | गवाले अमित राहुल | सहाय्यक प्राध्यापक | २८०८० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ०३. | शिंगटे दिव्या घनश्याम | सहाय्यक प्राध्यापक | २३७६० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| .B | **बेसिक सिव्हील इंजिनिअरिंग(UG)** | | | | | |
| ०१. | मोहिते ज्योती राकेश | सहाय्यक प्राध्यापक | २५९२० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ०२. | कदम अलोक भरत | सहाय्यक प्राध्यापक | २८०८० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| **अ. क्र.** | **शिक्षकाचे नाव** | **पदनाम** | **पगार प्रति महिना** | | **नियुक्ती** | |
| | | | **पगार** | **PF** | **पासून** | **पर्यंत** |
| .C | **कॉम्प्युटर सायन्स(UG) इंजिनिअरींग &** | | | | | |
| १. | जाधव अनुजा निलेश | सहाय्यक प्राध्यापक | ४३००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | सोनमळे मोनिका सुरेश | सहाय्यक प्राध्यापक | ४०००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ३. | भोसले वैभव उत्तम | सहाय्यक प्राध्यापक | ३७००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ४. | चव्हाण पल्लवी लक्ष्मीकांत | सहाय्यक प्राध्यापक | ३०२४० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ५. | बर्गे निकिता राजेंद्र | सहाय्यक प्राध्यापक | २८०८० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ६. | सोनमळे मिनल सुरेश | सहाय्यक प्राध्यापक | ३६७२० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ७. | श्रीरसागर अनिरुद्ध प्रकाश | सहाय्यक प्राध्यापक | ५०००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ८. | भोकरे उमा महेश | सहाय्यक प्राध्यापक | ४५००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | इनामदार शरीफनवाज याकुब | सहाय्यक प्राध्यापक | ५०००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| १०. | तावरे ऋतुजा मधुकर | सहाय्यक प्राध्यापक | २८०८० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ११. | खरात संध्या दत्तात्रय | सहाय्यक प्राध्यापक | २३७६० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| D. | **बेसिक कॉम्प्युटर सायन्स(UG) इंजिनिअरींग &** | | | | | |
| १. | चव्हाण विकास ज्ञानु | सहाय्यक प्राध्यापक | २८०८० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| E. | **इलेक्ट्रोनिक्स &टेली. इंजिनिअरिंग(UG)** | | | | | |
| १. | तपासे राजश्री बजरंग | सहाय्यक प्राध्यापक | ३६७२० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| F. | **बेसिक इलेक्ट्रोनिक्स &टेली. इंजिनिअरिंग(UG)** | | | | | |
| १. | घार्गे योगिता अभिजित | सहाय्यक प्राध्यापक | २६००० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| G. | **बेसिक मेकॅनिकल इंजिनिअरींग (UG)** | | | | | |
| १. | डाकवे उर्मिला हरीश | सहाय्यक प्राध्यापक | ३४००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | साबळे सायली मिलिंद | सहाय्यक प्राध्यापक | ३७५०० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ३. | मिसाळ स्नेहल विनायक | सहाय्यक प्राध्यापक | २३७६० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| H. | **गणित** | | | | | |
| १. | जाधव प्रिया अभय | सहाय्यक प्राध्यापक | २१००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | घाडगे विजया सुदाम | सहाय्यक प्राध्यापक | १७००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| ३. | फडतरे शितल लालासो | सहाय्यक प्राध्यापक | १७००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| **अ. क्र.** | **शिक्षकाचे नाव** | **पदनाम** | **पगार प्रति महिना** | | **नियुक्ती** | |
| | | | **पगार** | **PF** | **पासून** | **पर्यंत** |
| I. | **फिजिक्स** | | | | | |
| १. | डॉ. शेख शाहीन खुदाबक्ष | सहाय्यक प्राध्यापक | ४१००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | पवार कस्तुरी निर्मल | सहाय्यक प्राध्यापक | २५००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| J. | **केमिस्ट्री** | | | | | |
| १. | बाबर योगिता विक्रम | सहाय्यक प्राध्यापक | २८७६० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | कमाने अंकिता राजाराम | सहाय्यक प्राध्यापक | २२००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| K. | **इंग्लिश** | | | | | |
| १. | डॉ. पाटील पोपट देविदास | सहाय्यक प्राध्यापक | ४०००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| २. | जगदाळे उर्मिला श्रीकांत | सहाय्यक प्राध्यापक | १६००० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| L. | **ग्रंथपाल** | | | | | |
| १. | उमाप मनिषा हेमंत | ग्रंथपाल | ३६७२० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| M. | **ट्रेनिंग(TPO) प्लेसमेंट &** | | | | | |
| १. | पाटील संजीव विठ्ठल | टी.पी.ओ. | ६५००० | १८०० | १४.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |
| N. | **शारीरिक संचालक** (Physical Director) | | | | | |
| ०१. | संकपाळ मयुर शिवाजी | फिजिकल डायरेक्टर | २५००० | १८०० | ०१.०८.२०२३ | ३०.०६.२०२४ |

महाविद्यालयातील ADHOC शिक्षकांचा **Performance** व विभागप्रमुखांनी दिलेल्या गोपनीय अहवाल इ. बाबींचा विचार करून **Performance** नुसार पगार देण्याबाबत नियामक मंडळाचे सन्मानीय सदस्य मा.डॉ. एन. बी. पासलकर व मा. श्री. उदय जाधव यांनी मुलाखती घेऊन वरील सेवकांना देण्यात येणारे दरमहा वेतन सूचित केलेले आहे. तसेच कॉम्पुटर विभागात शिक्षक मिळत नसल्याने व **Software Company** मध्ये बी.ई. झालेल्या उमेदवारास कमीत कमी २५,०००

इतका पगार दिला जातो, त्यामुळे या विभागातील शिक्षकांना त्यांचा Performance व इतर बाबींचा विचार करून पगार देण्यास परवानगी द्यावी.

वरील नुसार मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी नियुक्त केलेले हंगामी (ADHOC ) शिक्षक सेवकांना दरमहा वेतन अदा करण्यास व नेमणूक आदेश मिळण्यास सभेने परवानगी दिली.

तसेच महाविद्यालयात कंत्राटी तत्वावर सध्या कार्यरत असलेले व नवीन नेमणूक करणेत येणाऱ्या शिक्षकेत्तर सेवकांना तक्त्यानुसार मानधन व वेतन अदा करणेस परवानगी मिळावी तसेच दरवर्षी वार्षिक वाढ देण्यास परवानगी मिळावी. असे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने तक्त्याचे अवलोकन करून व चर्चा करून महाविद्यालयात कंत्राटी / रोजंदारी तत्वावर कार्यरत असलेल्या सेवकांना मानधन / वेतन देण्यास परवानगी दिली.

सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर
अनुमोदक :- मा. प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर
मा. उदय जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ९ - कायम शिक्षक सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या कडून आलेल्या सातव्या वेतन आयोगाची अंमबलबजावणी करणेबाबत आलेल्या पत्राबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ९** - महाविद्यालयातील कायम शिक्षक सेवकांनी सादर केलेल्या विविध मागणी अर्ज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या कडून आलेले पत्र सोबत अर्ज जोडले आहे. तरी सभेने याबाबत चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करावे.

**वरील विषयाबाबत प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने खालील मुद्यां नुसार चर्चा व निर्णय घेण्यात आले.**

**१. DBATU या विद्यापीठाने सातव्या वेतन आयोग लागू करण्याच्या आलेल्या पत्राबाबत.**

**निर्णय** - सातव्या वेतन आयोग लागू करणेबाबत महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती पाहून व महाराष्ट्रातील इतर संस्थांचा अभ्यास करून सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत निर्णय घेण्यात येईल. याकरिता समिती गठीत करून अभ्यास पूर्ण प्रस्ताव सादर करावा असे सभेने चर्चा करून सुचविले. सदर समितीमध्ये खालील सदस्यांची निवड करून समिती गठीत करावी.

| | | |
|---|---|---|
| १.मा. विकास देशमुख | - | चेअरमन |
| २.मा. डॉ. एन. बी. पासलकर | - | सदस्य |
| ३.मा. डॉ. एम. बी. कुमठेकर | - | सदस्य |
| ४.मा. उदय जाधव | - | सदस्य |
| ५.प्रि. डॉ. ए. सी. अत्तार | - | सदस्य / सचिव |

**२. महाविद्यालयातील सेवकांनी दिलेल्या विविध अर्जाबाबत.**

**निर्णय** - महाविद्यालयातील सेवकांनी सादर केलेल्या सहावा वेतनाच पूर्वलक्षी प्रमाणे फरक मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत सभेने चर्चा केली. हा विषय आर्थिक बाबींशी निगडीत असल्यामुळे त्याबाबतचा निर्णय समितीने अभ्यास करून व महाविद्यालयातील आर्थिक बाबींचा विचार करून घ्यावा.

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



**विषय क्र. १० - महाविद्यालयातील कायमस्वरूपी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत तरी सेवानिवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची नियमितपणे भरती करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १० -** महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज करणेस अतिशय जिकीरीचे होत आहे. महाविद्यालयातील विविध विभागातील व कार्यालयातील माहिती जतन करणे व सादर करणेसाठी महाविद्यालयाच्या व संस्थेच्या उद्देशाने कायमस्वरूपी व जबाबदारी सेवक असणे आवश्यक आहे. सन २०१७-१८ पासून नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची नियमितपणे भरती करणेस सभेने चर्चा करून परवानगी द्यावी.

**Last Five Year Retirement Faculty & Staff**

| Sr. No. | Department | Designation | Year | | | | | | Total Retirement |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | |
| 01. | Mechanical Engineering | Associate Prof. | - | - | - | - | - | 1 | **1** |
| | | Assistant Prof. | - | - | - | - | - | - | - |
| | | Technical / Lab Assistant | - | 1 | 1 | 2 | 1 | 3 | **8** |
| 02. | Civil Engineering | Associate Prof. | 1 | - | - | 1 | - | - | **2** |
| | | Assistant Prof. | - | - | - | - | - | - | - |
| | | Technical / Lab Assistant | - | - | - | - | - | - | - |
| 03. | Computer Science & Engineering | Associate Prof. | - | - | - | - | - | - | - |
| | | Assistant Prof. | - | - | - | - | - | - | - |
| | | Technical / Lab Assistant | - | - | - | - | 1 | - | **1** |
| 04. | E & Tc Engineering | Associate Prof. | - | - | 4 | - | 1 | 2 | **7** |
| | | Assistant Prof. | - | - | - | - | - | - | - |
| | | Technical / Lab Assistant | - | - | - | 1 | - | 1 | **2** |
| 05. | Gymkhana | Physical Director | - | - | - | 1 | - | - | **1** |
| 06. | Office / Library | Office & Library Staff | - | 1 | 1 | 2 | 2 | 2 | **8** |
| | | Peon | - | - | 1 | 3 | - | 1 | **5** |
| **Total** | | | **1** | **2** | **7** | **10** | **5** | **10** | **35** |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

## Faculty & Staff Requirement for 2023-24 (As Per AICTE)

| Sr. No. | Designation | Total Required | Retirement (Last 5 Year) | Actual Regular Working | Total Post Vacant |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Professor | 5 | - | - | 5 |
| 02. | Associate Professor | 10 | 10 | 8 | Comp- 3 E &Tc - 0 Mech - 0 Civil - 1 |
| 03. | Assistant Professor | 30 | - | 21 | 9 |
| 04. | BSH Faculty | 15 | - | 1 | 14 |
| 05. | Physical Director | 1 | 1 | - | 1 |
| 06. | Libriran | 1 | - | - | 1 |
| 07. | TPO | 1 | - | - | 1 |
| 08. | Technical Assistant / Lab Assistant | 24 | 11 | 6 | 18 |
| 09. | Clerk | 12 | 3 | 3 | 9 |
| **Total** | | **99** | **25** | **39** | **62** |

महाविद्यालयातील सर्व विभाग, कार्यालय, ग्रंथालय, कार्यशाळा (Workshop) इ. विभागात विविध पदावर कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे वयोमनानुसार सेवानिवृत्त होत आहे. तसेच शिखर संस्थांना नियमानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची माहिती सादर करणेस अडचणीचे होत आहे. FRA व AICTE यांची दरवर्षी मान्यता घेण्यासाठी नियमानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची संख्या असणे आवश्यक आहे. त्यानुसार FRA या शिखर संस्थेची दरवर्षी फी निश्चित करणेसाठी सेवकांच्या पगारावर व इतर खर्चावर शैक्षणिक फी ठरवली जाती. त्यानुसार सेवानिवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर नवीन सेवकांची नियुक्ती करणे आवश्यक असून सभेने चर्चा करून परवानगी द्यावी.

**वरील पाच वर्षात सेवानिवृत्त झालेल्या तक्त्यानुसार व नवीन पदे भरण्याच्या दृष्टीने विद्यापीठ व AICTE यांच्या नियमानुसार शिक्षक सेवक भरण्याचा प्रस्ताव तयार करावा त्यासाठी लागणारे आर्थिक बजेट तयार करून पुढील नियामक मंडळाच्या सभेमध्ये मांडावे त्यानुसार पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तसेच महाविद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर (Non-Teaching) पद भरती कंत्राटी पद्धतीने भरणेबाबत सभेने सुचविले त्यासाठी लागणारी GST रक्कम भरावी लागत असेल तरी चालेल असे सभेने सुचविले. यानुसार शिक्षकेत्तर रिक्त असलेल्या पदाबाबत सभेने चर्चा करून निर्णय घेण्यात आला.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ११ — महाविद्यालयातील सेवकांनी केलेल्या कोर्ट केस बाबतची चर्चा करणे.**

**ठराव क्र. ११ —** १. प्रा. देवी धनंजय बी. व डॉ. आलदर दिलीप एस. यांनी बदली व निलंबनाच्या विरुद्ध मुंबई हायकोर्ट येथे रयत शिक्षण संस्था व महाविद्यालय यांच्या विरुद्ध याचिका दाखल केलेली आहे. तरी याबाबतची पुढील तारीख दि. ११.१०.२०२३ रोजी आहे.

२. महाविद्यालयातील सेवानिवृत्त झालेले कायम सेवकांना कामगार न्यायालय येथे विविध आर्थिक मागण्याकरिता याचिका दाखल केलेली आहे.

**वरील विषयाबाबत सभेने चर्चा करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.**

**०१. . देवी धनंजय बी. व डॉ. आलदर दिलीप एस. यांनी बदली व निलंबनाच्या विरुद्ध मुंबई हायकोर्ट येथे रयत शिक्षण संस्था व महाविद्यालय यांच्या विरुद्ध याचिका दाखल केलेली आहे.**

**निर्णय** :- मुंबई हायकोर्ट येथे रयत शिक्षण संस्थेच्या वकीलामार्फत संस्थेची व महाविद्यालयाची बाजू मांडावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असे सभेने चर्चा करून सुचविले.

**०२. महाविद्यालयातील सेवानिवृत्त झालेले कायम सेवक हे विविध आर्थिक मागण्यासाठी कामगार न्यायालयात याचिका दाखल केली असून याबाबत न्यायालयाकडून आलेल्या नोटीस बाबत चर्चा**

**निर्णय** - न्यायालयाकडून आलेल्या नोटीसाबाबत रयत शिक्षण संस्थेच्या वकीलामार्फत संस्थेची व महाविद्यालयाची बाजू मांडावी व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असे सभेने चर्चा करून सुचविले.

**सूचक :- मा. उदय जाधव**
**अनुमोदक :-**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १२ — महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. १२ .१ — प्रलंबित देयके अदा करणेकामी मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १२ .१ —** सन - २०१६-१७, २०१८-१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षात वितराग कॉम्प्युटर व येवले इलेक्ट्रोनिकस यांच्या कडून प्रिंटर तसेच CCTV ची उपकरणे खरेदी केलेली होती. सदर खरेदीची बिले लेखा विभागास वेळेवर प्राप्त न झाल्याने सदर बिले त्या त्या आर्थिक वर्षात खर्ची टाकता आलेली नाहीत.

अ. वीतराग कॉम्प्युटर्स रू. १७,४००/- (आर्थिक वर्ष २०१८-१९ - सदरचे बिल तत्कालीन भांडारपाल यांच्याकडे पुढील कार्यवाही साठी जमा केले होते. परंतु त्यांच्या निलंबना मुळे सदरचे बिल आजरोजी लेखाविभागास प्राप्त झालेले नाही.)

आ. येवले इलेक्ट्रोनिक रू. १९,६३०/- (आर्थिक वर्ष २०१६-१७ - सदरचे CCTV बिल परीक्षा विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात परत देण्याच्या अटीवर घेतलेले होते. सदर CCTV संबधित पुरवठादारास परत केलेले नाही.)

इ. येवले इलेक्ट्रोनिक रू. ७४,६०६/- (आर्थिक वर्ष २०१९-२० - सदरचे CCTV महाविद्यालयाच्या नवीन कार्यालयामध्ये बसविणेत आलेले आहेत. सदरचे बिल वेळेवर लेखाविभागात प्राप्त झालेले नाही.)

तरी सदर बिले चालू आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यास सभेची परवानगी मिळावी.

**याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने वरील बिलाबाबत चर्चा करून चालू आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात परवानगी दिली.**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**विषय क्र. १२.२ – सुधारित दराने प्रवास व दैनिक भत्ता देणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १२.२ –** महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी बाहेर गावी जावे लागते. सदर सेवकांना यासाठी प्रवास खर्च व दैनिक भत्ता संस्था नियमानुसार अदा केला जातो. संस्था नियमानुसार मिळणारी रक्कम व प्रत्यक्ष येणारा खर्च यात भरपूर तफावत दिसून येते. तरी सदर प्रवास खर्च व दैनिक भत्ता सुधारित निकषांद्वारे अदा करण्याची सभेने परवानगी द्यावी.

प्रशासकीय कामकाजानिमित्त मुंबई, पुणे, कोल्हापूर इ. येथे जावे लागते अशा वेळी शिवशाही व खाजगी बसने प्रवास करावा लागतो, तसेच त्याठिकाणी चहापाणी, नाष्टा व जेवण याकरिता येणारा खर्च DA पेक्षा जास्त येतो यामुळे होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे बिले खर्ची टाकण्यास परवानगी मिळावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, या ठिकाणी जाण्यास सोयीस्कर बस सुविधा उपलब्ध नसल्याने दोन किंवा दोन पेक्षा जास्त सेवक विद्यापीठात जाणार असतील तर स्वतंत्र वाहन करून जाण्यास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास परवानगी मिळावी.

**वरील नुसार मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. सध्याच्या परिस्थिती नुसार शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज जलद गतीने होणेकरिता वरील प्रमाणे प्रवास केल्यास प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास सभेने चर्चा करून झालेल्या प्रवास खर्च ज्या त्या आर्थिक वर्षातच खर्ची टाकण्यास परवानगी दिली.**

**विषय क्र. १२.३ - महाविद्यालयाच्या सभागृह व विभागाकरिता नवीन खुर्च्या, 160 KV Generator, Interactive Panel / Smart Board खरेदी, Exam Centre Renovation, क्लासरूम रेनोव्हेशन व बाथरूम रेनोव्हेशन करणेकामी मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १२.३ –** महाविद्यालयासाठी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करणे व दुरुस्ती खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर खर्चासाठी सभेची परवानगी मिळावी.

| अ.क्र. | खरेदी तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १. | सभागृहाकरिता व विभागासाठी नवीन खुर्च्या | ८,००,०००/- |
| २. | 160 KV Generator | १५,००,०००/- |
| ३. | Interactive Panel / Smart Board-5 | १०,००,०००/- |
| ४. | Exam Centre Renovation | १०,००,०००/- |
| ५. | क्लासरूम रेनोव्हेशन | २५,००,०००/- |
| ६. | बाथरूम रेनोव्हेशन | १६,००,०००/- |
| ७. | सर्व विभागातील Lab Equipment बजेटनुसार | ३०,००,०००/- |

**वरील तक्त्यानुसार सभेतील सन्मानीय सदस्य यांनी याबाबत चर्चा करून वरील तक्त्यातील कामकाज करणेसाठी होणारा खर्च हा टप्याटप्याने करण्यात यावा व साहित्य खरेदी करताना संस्था नियमानुसार साहित्य खरेदी करावे. तसेच रेनोव्हेशन करताना महाविद्यालयाच्या आर्थिक बाबींचा विचार करून वरील नुसार रेनोव्हेशन करणेस सभेने परवानगी दिली.**

**विषय क्र. १२.४ — महाविद्यालयाचे सभागृह भाडे तत्वावर देणे व दरपत्रकाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. १२.४**— महाविद्यालयाचे सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार नियामक मंडळातील सन्मानीय चेअरमन व सदस्यांच्या सुचनेनुसार सभागृह भाडे तत्वावर देणेसाठी दरपत्रक तयार करण्यात यावे.त्यानुसार खालील दरपत्रक तयार करणेत आलेले आहेत तरी सभेने खालील दरपत्रकाबाबत चर्चा करून सभागृह भाडे तत्वावर देण्यास परवानगी द्यावी.

| अ.क्र. | | पूर्ण दिवस (GST सहित) | | अर्ध दिवस (GST सहित) | |
|---|---|---|---|---|---|
| | | AC | Non AC | AC | Non AC |
| १. | रयत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असलेले शाळा व महाविद्यालये | ६,०००/- | ३,०००/- | ३,०००/- | २,०००/- |
| २. | महाविद्यालयातील सेवक | ६,०००/- | ३,०००/- | ३,०००/- | २,०००/- |
| ३. | इतर संस्था | १०,०००/- | ८,०००/- | ५,०००/- | ४,०००/- |

**वरील तक्त्यानुसार सभेने चर्चा करून सभागृह हे भाडे तत्वावर देणेबाबत व वरील दरपत्रकानुसार भाडे आकारण्यात परवानगी दिली. तसेच महाविद्यालयातील सभागृह हे शैक्षणिक व** Industrical **कामकाजासाठी वापर करणेत यावा. रयत शिक्षण संस्थेचे डी. जी. कॉलेज, सातारा व वाय. सी. कॉलेज सातारा यांच्या सोबत सभागृहाबाबत चर्चा करून मार्गदर्शन घेण्यात यावे त्यानुसार कार्यवाही करावी असे सभेने चर्चा करून सूचित केले.**

**विषय क्र. १२.५ - सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन निवेदाद्वारे रीतसर नेमणूक करणेत आलेली होती. सदर नेमणूक कालावधी माहे फेब्रुवारी २०२३ रोजी पूर्ण झाली असून माहे मार्च २०२३ पासून दरमहा दिलेल्या आदेशानुसार वेतन अदा करणेस परवानगी मिळावी..**

**ठराव क्र. १२.५** :- सन २०२२-२३ मध्ये महाविद्यालयासाठी सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन निवेदाद्वारे रीतसर नेमणूक करणेत आलेली होती. सदर नेमणूक नुसार रीतसर संस्थेमार्फत आदेश देण्यात आलेला होता. परंतु सदर नेमणूकीचा कालावधी हा माहे फेब्रुवारी २०२३ ला पूर्ण झालेला आहे. तदनंतर सुरक्षा रक्षक यांची नेमणूक करणेसाठी महाविद्यालयात येणाऱ्या NBA कमिटीच्या अनुषंगाने व कामकाजाच्या अभावी सदरची प्रक्रिया करणेत आली नसल्याने पुढील सुरक्षा रक्षक निविदा मंजूर होईपर्यत मागील दराने सुरक्षा रक्षक यांची सेवा चालू ठेवण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी मिळावी.

**वरील नुसार नेमणूक केलेल्या सुरक्षा रक्षक निवेदकाचा कालावधी पूर्ण झाला असून पुढील सुरक्षा रक्षक निविदा मंजूर होईपर्यत मागील दराने सुरक्षा रक्षक यांची सेवा चालू ठेवण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली.**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. १२.६ — द्वितीय वर्ष सिव्हील मधील विद्यार्थी गौरव गाडे फी माफीबाबत.**

**ठराव क्र. १२.**:- कु. गौरव गाडे याने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ला द्वितीय वर्षात प्रवेश घेतला होता. परंतु सदर विद्यार्थ्यांचे वडील आजारग्रस्त असल्याने सदर विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण करणे शक्य होत नाही. तसेच सदर विद्यार्थी हा सध्या नोकरी करत असल्याने तो पुढील शिक्षण घेऊ इच्छित नाही. तरी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या विनंती वरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे प्रवेश रद्द करून फी माफी मिळावी अशी विनंती केलेली आहे. तरी याबाब सभेने चर्चा करून कु. गौरव गाडे या विद्यार्थ्यांची फी माफी करणेस मंजुरी मिळावी.

**याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती देऊन सदर सभेने कु. गौरव गाडे या विद्यार्थ्याची आर्थिक परिस्थितीचा विचार करून फी माफ करण्यास परवानगी दिली.**

**तसेच अशा पद्धतीचे अर्ज आल्यास व विद्यार्थी महाविद्यालय सोडून जाणार असल्यास अशा विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थीचा आढावा घेऊन वेळोवेळी सभेमध्ये विषय घेण्यात यावा असे सभेने सूचित केले.**

**सूचक** :- **मा. उदय जाधव**
**अनुमोदक** :- **मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १३ - मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र. १३.०१ - महाविद्यालयातील** Consultancy Remuneration **बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.१३.०१** - मा. डॉ एन. वी पासलकर सदस्य नियामक मंडळ (BOG) यांनी महाविद्यालयातील Consultancy Remuneration बाबत मुद्दा उपस्थित केला यामध्ये जे शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक Consultancy करत असतात त्यामध्ये महाविद्यालयाचे Infrastructure, College Machinery इत्यादी बाबींचा वापर होत नाही. अशा शिक्षकांना Consultancy Remuneration हे College of Engineering, Pune (COPE) या महाविद्यालयात देण्यात येणारे Consultancy बाबतचा अभ्यास करून त्यानुसार महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना Consultancy Remuneration देण्यात यावे असे सुचविले.

**सूचक** :- **मा. डॉ. एन.बी. पासलकर**
**अनुमोदक** :- **डॉ. सौ. एस. व्ही. माने**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

***नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ इतिवृतांत***

**विषय क्र. १३.०२ - महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे शिक्षक सेवक यांना इतर संस्था मध्ये माहिती घेण्यास पाठविणे व सेवकांच्या करिता** Attitude Training **घेणेबाबत**.

**ठराव क्र.१३.०२** - महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे शिक्षक सेवक यांना **COE Pune, IIT Mumbai, BIT's Pilani** अशा संस्थाना भेट देऊन सदर संस्थामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात त्याची माहिती घेऊन आपल्या महाविद्यालयाकरिता काय उपक्रम राबविण्यात येतील याची माहिती तयार करणेत यावी. तसेच **COE Pune, IIT Mumbai, BIT's Pilani** या संस्थांच्या FDP मध्ये महाविद्यालयातील शिक्षक सेवकांनी सहभाग घ्यावा असे सुचविले

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या साठी **Attitude Training** आयोजित करावे असे सुचविले व महाविद्यालयातील सर्व सेवकांच्या बरोबर मा. चंद्रकात दळवी चेअरमन रयत शिक्षण सातारा व मा. विकास देशमुख सचिव रयत शिक्षण संस्था सातारा यांनी सभा घेऊन महाविद्यालय **Devlopment** व सर्वांगीण विकासाकरिता चर्चा करून मार्गदर्शन करावे असे ठरले.

**सूचक** :- **मा. विकास देशमुख**
**अनुमोदक** :- **मा. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा